मंत्र 24-08-2022

वाद जेंव्हा सवांदात होतात,
खंडीत माळा विचारांची होते.
अतिरेकांत मतामतांच्या,
वादंगाचेच रान माजते. -१-

वृध्दि नेहमी ज्ञानाची,
वैचारिक भागिदारीत असते.
उत्तम विचारांची बीजं,
स्विकारण्यांत चांगले असते. -2-

मानसिक शांती करिता,
ताळमेळ जपळाच पाहिजे.
कुठे? केंव्हा? सवांदात
थांबावे कळलेच पाहिजे. -3-

आपल्याच वाटेवर काटे.
वादांत गुंतून टाकु नये.
मौनम् सर्वार्थ साधनम्
मंत्र कधिच विसरु नये -४-

सुभाष
(महाराष्ट्र)

